
दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक १११ वा ● शनिवार ०७ सप्टेंबर २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-
| * Volume 2 | Issue 111 | Date : 07/09/2024 | blow Saturday | Page 4 Price 4




### भाजपचा जाहीरनामा प्रसिद्ध
# काश्मीरमध्ये पुन्हा 'अनुच्छेद ३७०' नाहीच! गृहमंत्री अमित शहा यांचा दावा




**दैनिक यशसिद्धी न्युज**

जम्मू: "अनुच्छेद ३७० ही भूतकाळातील गोष्ट आहे. जम्मू-काश्मीरमध्ये आता पुन्हा कधीही अनुच्छेद ३७० लागू होणार नाही. कारण ते राज्यघटनेचा भाग नाही," असे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी शुक्रवारी सांगितले. जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीनिमित्त शहा यांच्या हस्ते भाजपचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. त्या वेळी त्यांनी पुन्हा अनुच्छेद ३७० लागू करण्याचा प्रयत्न हाणून पाडू, असे सांगितले.

अनुच्छेद ३७० रद्द करणे हे नरेंद्र मोदी सरकारचे सर्वात मोठे यश असल्याचे भाजपच्या जाहीरनाम्यात नमूद केले आहे. अनुच्छेद ३७० ही तरुणांच्या हातात शस्त्रे आणि दगड देणारी गोष्ट होती. या अनुच्छेदामुळे तरुणांना दहशतवादाकडे वळण्यास भाग पाडले. नॅशनल कॉन्फरन्सचा मूक पाठिंबा आहे. मात्र आम्ही पुन्हा जम्मू-काश्मीरमध्ये अनुच्छेद ३७० लागू होऊ देणार नाही, असे गृहमंत्र्यांनी सांगितले.

जम्मू-काश्मीर हा नेहमीच भारताचा भाग आहे आणि सरकार दहशतवाद आणि फुटीरतावादाशी लढण्यावर भर देत आहे, यावर अमित शहा यांनी जोर दिला. "२०१४ पर्यंत जम्मू- काश्मीर नेहमीच फुटीरतावाद आणि दहशतवादाच्या छायेत राहिले. या प्रदेशातील आणि प्रदेशाबाहेरील अनेक शक्तींने हा प्रदेश अस्थिर कसा राहील यासाठीच प्रयत्न केले. २०१४ नंतरची १० वर्षे राज्यासाठी सुवर्णकाळ म्हणून ओळखली जातील, असे शहा म्हणाले.जम्मू-काश्मीरमधून दहशतवाद आणि फुटीरतावाद नष्ट करण्यावर केंद्र सरकारने लक्ष केंद्रित केले आहे, असे अमित शहा यांनी सांगितले.

## गणरायाच्या आगमनानिमित्त शहरातील वाहतूक मार्गात बदल

**दैनिक यशसिद्धी न्युज**

सोलापूर/प्रतिनिधीः शहरात शनिवार, ७ सप्टेंबर रोजी सार्वजनिक गणेशमूर्ती प्रतिष्ठापना संपन्न होणार आहे. तसेच १० रोजी गौरी गणपती आवाहन असल्याचे धार्मिक साहित्य खरेदीसाठी नागरिकांची गर्दी होते. त्यासाठी शहरातील वाहतूक मार्गात पोलिसांनी बदल केला आहे. शहरातील मधला मारुती, टिळक चौक, कोंतम चौक, माणिक चौक, मंगळवार पेठ पोलीस चौकी या परिसरात पूजेसाठी व धार्मिक विधीसाठी लागणारे साहित्य खरेदी करण्याकरिता नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने उद्या ६ ते १२ सप्टेंबरपर्यंत या परिसरातील मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांवर बंदी घालण्यात येत असल्याचे प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांनी म्हटले आहे. टिळक चौक ते कोंतम चौक व माणिक चौक ते मंगळवार पेठ पोलीस चौकी या मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनास बंदी घालण्यात आली आहे. वाहनधारकांना बाळीवेसकडून बीएसएनएल ऑफीस, मंगळवार पेठ पोलीस चौकी, कुंभार वेसमार्गे कोंतम चौक, तसेच टिळक चौकाकडून जुनी कसबा पोलीस चौकी, माणिक चौक, समाचार चौकमार्गे कोंतम चौक असा पर्यायी मार्ग उपलब्ध असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

## शिक्षकांनी विद्यार्थ्यांन शैक्षणिक सहलीवर घेऊन हावे : पंतप्रधान मोदी

**दैनिक यशसिद्धी न्युज**

नवी दिल्ली : शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विविध भाषांमध्ये स्थानिक लोककथा शिकवाव्यात, जेणेकरून विद्यार्थ्यांना अनेक भाषा शिकता येतील आणि भारताच्या आपल्या देशाबद्दल सर्वांगीण माहिती घ्यायला मदत होईल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सूचित केले. यामुळे पर्यटनाला चालना मिळेल आणि स्थानिक अर्थव्यवस्थेलाही गती मिळेल, असे ते म्हणाले.



पंतप्रधान मोदी यांनी शुक्रवारी राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांशी संवाद साधला. यावेळी मोदी यांनी नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या प्रभावावर चर्चा केली चैतन्यपूर्ण संस्कृतीची त्यांना ओळख होईल. शिक्षकांनी भारताच्या विविधतेचा शोध घेण्यासाठी आपल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहलीवर घेऊन जावे, ज्यामुळे त्यांचे शिक्षण सुलभ होईल आणि त्यांना आणि मातृभाषेत शिक्षण घेण्याचे महत्त्व विशद केले. पुरस्कार विजेत्या शिक्षकांनी त्यांचा अध्यापनाचा अनुभव पंतप्रधानांना सांगितला. शिक्षण अधिक सुगम बनवण्यासाठी । पान २ वर

## राज्यात सव्वा दोन वर्षांत ३.१४ लाख कोटी रुपयांची विक्रमी परकीय गुंतवणूक : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यशसिद्धी न्युज**

मुंबई : देशातील एकूण परकीय गुंतवणुकीची एप्रिल ते जून २०२४ या पहिल्या तिमाहीची आकडेवारी समोर आली असून देशात झालेल्या एकूण गुंतवणुकीपैकी तब्बल ५२.४६ टक्के गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात झाली असून राज्याने परकीय गुंतवणुकीत आपले अव्वल स्थान कायम राखले असल्याची माहिती, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. राज्यातील एकूण परकीय गुंतवणुकीबाबत माहिती देताना उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, राज्यात २०१४ ते २०१९ या काळात सत्तेत असताना एकूण ३ लाख ६२ हजार १६१ कोटी रुपयांची परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात आली होती. आता सव्वा दोन वर्षांत ३ लाख १४ हजार ३१८ कोटी रुपयांची गुंतवणूक शासनाने राज्यात आणली. दुसऱ्या तिमाहीची आकडेवारी अजून बाकी असल्याने एकूण गुंतवणुकीचा आकडा आणखी वाढणार आहे.उद्योगस्नेही धोरणामुळे राज्य गेले दोन वर्षे सातत्याने परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यात क्रमांक एकवर राहिले आहे. २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत सुद्धा राज्यात



सर्वाधिक गुंतवणूक आली आहे. एप्रिल ते जून २०२४ या पहिल्या तिमाहीत देशात आलेली एकूण गुंतवणूक ही १ लाख ३४ हजार ९५९ कोटी रुपये इतकी असून, त्यापैकी ७० हजार ७९५ कोटी अर्थात ५२.४६ टक्के गुंतवणूक राज्यात आली आहे. कर्नाटक, दिल्ली, तेलंगणा, गुजरात, तामिळनाडू, हरयाणा, उत्तरप्रदेश व राजस्थान या राज्यांमध्ये झालेल्या गुंतवणुकीच्या एकत्रित बेरजेपेक्षाही अधिक गुंतवणूक ही एकट्या महाराष्ट्रात झाली आहे.

## श्री गणरायाचे आगमन आनंद, समृद्धी – समाधानाचे पर्व घेऊन येवो : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**दैनिक यशसिद्धी न्युज**

मुंबई : श्री गणरायाचे आगमन राज्याच्या विकास चक्राला गती देण्यासाठी राबणाऱ्या प्रत्येकासाठी, शेतकरी, कष्टकरी, कामगार बांधवासाठी राज्यातील माता-भगिनींसाठी, आबाल-ज्येष्ठांसाठी आनंदाचे, आरोग्यदायी, समृद्धीचे,



समाधानाचे पर्व घेऊन येवो, अशी प्रार्थना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. श्री गणेश आगमनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी राज्यातील नागरिकांसह, जगभरातील तमाम गणेश भक्तांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. श्री गणेशांचे अखंड कृपाछत्र महाराष्ट्रावर राहावे, अशी मनोकामनाही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी बाप्पा चरणी केली आहे.

शुभेच्छा संदेशात मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणतात की, श्री गणेशाचे आगमन दरवर्षी एक नवी ऊर्जा, प्रेरणा आणि उत्साह घेऊन येते. यातून मंगलमय, पवित्र वातावरण निर्माण होते. गणेशोत्सवातून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडते. म्हणून जगाचेही महाराष्ट्राकडे लक्ष लागलेले असते. श्री गणेशाला कलाधिपती मानले जाते. त्यामुळे या उत्सव काळात कलाविष्कारालाही उधाण येतं. महाराष्ट्राचा काना कोपरा अशा अविष्कारांनी, । पान २ वर

## पेन्शन फंड नियामक आणि विकास प्राधिकरण अंतर्गत जिल्हास्तरीय कार्यक्रम संपन्न




**दैनिक यशसिद्धी न्युज**

सोलापूर/प्रतिनिधीः पेन्शन फंड नियामक आणि विकास प्राधिकरण (पीएफआरडीए), नवी दिल्ली अंतर्गत राज्यस्तरीय बँकर्स समिती, पुणे (एसएलबीसी) आणि जिल्हा अग्रणी बँक, सोलापुर यांच्या वतीने अटल पेन्शन योजना (एपीवाय) जिल्हास्तरीय आउटरीच कार्यक्रमाचे बालाजी सरोवर, सोलापुर येथे संपन्न झाला.

या कार्यक्रमासाठी पीएफआरडीएचे मुख्य महाप्रबंधक परवेश कुमार हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. समाजातील संगठीत व असंगठीत वर्गाला कशाप्रकारे अटल पेन्शन योजना फायदेशीर राहील याविषयी मार्गदर्शन त्यांनी यावेळी केले. तसेच सर्व बँकांनी मिळून सोलापुर जिल्ह्यासाठी आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये दिलेले लक्ष्य १२२ टक्केवारीसह प्राप्त केल्याबद्दल, सोलापुर जिल्यामधील सर्व बँका व जिल्हा अग्रणी बँकेचे अभिनंदनही केले.

सोलापुर जिल्ह्यातील सर्व बँकांपैकी विशेषतः प्रामुख्याने बँक ऑफ इंडिया, कोटक महिंद्रा बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, विदर्भ कोंकण ग्रामीण बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया, कर्नाटक बँक, युनियन बैंक ऑफ इंडिया, आयडीबीआय बँक या आठ बँकांनी त्यांच्या उत्कृष्ट कामिगीरीबद्दल पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच जिल्हा अग्रणी बँक, सोलापुर व जिल्हा अग्रणी बँक, धाराशिव यांनाही जिल्हास्तरीय लक्ष्यपूर्ती केल्याबद्दल पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

पीएफआरडीएचे उप महाप्रबंधक रुबी भावसार यांनी अटल पेन्शन योजनेविषयी सखोल माहिती दिली. यामध्ये प्रामुख्याने १८ ते ४० वयोगटातील या योजनेसाठी पात्र असणारा भारतीय नागरिक त्याच्या वयाच्या ६० वर्षानंतर त्याच्या कुटुंबासाठी १००० रु ते ५००० रुपये पर्यंत कशाप्रकारे एक वाढीव उत्पन्न मिळवुन देणारा सदस्य असू शकतो याबद्दल सविस्तर माहिती दिली. अटल पेन्शन योजना ही खातेदाराच्या मृत्युनंतर, त्याच्या पती अथवा पत्नी यांना सुद्धा मिळू शकते अशी माहिती दिली. । पान २ वर

### मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना....
## लाभार्थ्यांनी बँकेविषयी तक्रार असेल तर हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**✻ बँकांनी लाडकी बहीण योजनेचे पैसे कपात केले असतील तर ते संबंधित लाभार्थ्याच्या बँक खात्यावर परत येतील, लाभार्थ्यांनी हेल्पलाइन क्रमांकावर तक्रार करावी**

**दैनिक यशसिद्धी न्युज**

सोलापूर/प्रतिनिधीः जिल्ह्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत दिनांक १४ ऑगस्ट २०२४ पासून पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर योजनेचे पैसे जमा होण्यास सुरुवात झालेली आहे. परंतु काही बँकांकडून लाभार्थ्यांच्या बँक खात्यावरील पैसे विविध कारणास्तव परस्पर कपात केले जात आहेत. तरी जिल्ह्यातील सर्व बँकांना संबंधित लाभार्थ्याचे बँक खात्यावरील पैसे कपात करू नये याबाबत सुचित करण्यात आलेले आहे. या पार्श्र्वभूमीवर कोणत्याही लाभार्थ्यांचे बँक खात्यातून पैसे कपात झाले असतील तसेच या योजनेच्या अनुषंगाने बँकेशी संबंधित कोणतीही तक्रार असेल तर प्रत्येक तालुका निहाय हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध करून दिलेले आहेत, त्यावर आपल्या तक्रारी नोंदवाव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत तालुका निहाय संपर्क अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली असून हेल्पलाईन क्रमांक खालील प्रमाणे देण्यात येत आहेत....

माढा - संरक्षण अधिकारी श्रीमती उज्वला कापसे मो.नं. ८३०८२७३११४, विस्तार अधिकारी बंडु खेताडे मो.नं.७०३०३८४७११, विस्तार अधिकारी आकाश कोकाटे मो.नं. ७०३०३८४७११

बार्शी - विस्तार अधिकारी शैलेश सदाफुले मो.नं.८२०८२१३९२१, विस्तार अधिकारी सुरज काटकर मो.नं. ८२०८२१३९२१

उत्तर सोलापूर- संरक्षण अधिकारी अविनाश जेठीयार मो.नं. ८६९८४७५८०८, विस्तार अधिकारी रवि पाटील मो.नं.७५८८०४६२५९

मोहोळ - संरक्षण अधिकारी उज्वला कापसे मो.नं.८३०८२७३११४, विस्तार अधिकारी शिलादेवी दाढे मो.नं.९९७५५६७७३२

सांगोला- संरक्षण अधिकारी सचिन चव्हाण मो.नं.७८७५६९३२४१, विस्तार अधिकारी प्रविण गायकवाड मो.नं.८४२१९१०९२८,

करमाळा - संरक्षण । पान २ वर

# संपादकीय

## मदत करायला हवी...

प्रत्येक संवेदनशील मन हळहळले. या चिमुरड्यांवरील अत्याचाराची झळ जवळजवळ सर्वांनाच पोहोचली आणि उत्स्फूर्तपणे लोक रस्त्यावर उतरले. बदलापूरपूर्वी कोलकात्यातही अशी घटना घडली. प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर अत्याचार झाला आणि मग तिची निर्घृण हत्या झाली. त्यानंतरही देश हळहळला. पण, एवढा उत्स्फूर्त जनक्षोभ तेव्हा दिसला नाही. असे म्हणतात की, एखादी घटना जेव्हा तुमच्या जवळ घडते तेव्हा त्याची तीव्रता तुम्हाला अधिक जाणवते. त्यामुळेच कदाचित बदलापूर प्रकरणाचे पडसाद आपल्याकडे फारच तीव्र उमटले. प्रत्येक मुलीची आई बदलापूर घटनेमुळे मुळापासून हादरली असेल. आपल्या मुलीला बाहेरच्या सगळ्या विपरीत परिस्थितीपासून कसे वाचवायचे, हा एकच विचार तिच्या मनात सुरू असेल. बदलापूरच्या घटनेनंतरही अशा अनेक घटना दररोज समोर येत आहेत आणि या घटनांची संख्या ही काळजीत भरच टाकणारी आहे. या सगळ्याबद्दल नेहमीप्रमाणेच महिला सुरक्षेबाबत चर्चा झडतील, आरोप-प्रत्यारोप होतील. या सगळ्यात न अडकता आपण एकच गोष्ट अत्यंत प्रभावीपणे करू शकतो आणि ती म्हणजे मुलींचे मानसिक बळ वाढवण्याची. बदलापूरच्या घटनेनंतर एकूणच अशा धक्क्यातून मुलींना कसे सावरावे, कसे बळ द्यावे आणि त्यांना पुन्हा कसे उभे करावे, याबाबतची चर्चा कमीच झाली. मात्र, अशा घटनांना बळी पडलेल्या मुलींसाठी मानसिक आधार हाच योग्य पर्याय असल्याचे मानसोपचारतज्ज्ञ सांगतात. पुरुष शरीराने मजबूत असतात तर महिला या मनाने कणखर असतात आणि अशा प्रसंगात महिलांचा हा कणखरपणाच उपयोगी पडतो. म्हणूनच त्या कोणत्याही कठीण प्रसंगाला धीराने सामोरे जात असतात. अगदी पुरुष ढेपाळले तरी कठीण प्रसंगात महिलांची चिकाटी वाखाणण्याजोगी असते. त्याचाच आधार घेत आपल्याला या मुलींना अशा वाईट प्रसंगातून सुखरूपपणे बाहेर काढायचे असते आणि आपल्या काळजाच्या तुकड्यासाठी एवढे तर आपण नक्कीच करू शकतो, नाही का? राजस्थान, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेशपाठोपाठ महाराष्ट्रातही लैंगिक शोषण करून जीवे मारण्याचे प्रमाण जास्त आहे. अत्याचाराच्या ३७ टक्के घटनांमध्ये पीडितेचा खून करणे किंवा तिच्या गुप्तांगावर शस्त्राने वार करणे, जीभ छाटणे असे क्रूर प्रकार केले जातात. अशा घटनांवर कायद्याने चाप बसवायला तर हवाच, पण त्याचसोबत पालकांनी आपल्या मुलांना मानसिक बळ देऊन त्यांना या धक्क्यातून बाहेर यायला मदत करायला हवी.

पान १ वरुन

## पेन्शन फंड नियामक आणि विकास

तसेच या योजनेबाबत उपस्थितांचे शंका निरसनही केले. राज्यस्तरीय बँकर्स समितीचे उप महाप्रबंधक दिपक पाटील यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. या कार्यक्रमास बँक ऑफ इंडीयाचे आंचलिक प्रबंधक चंद्रशेखर मंत्री, ,आंचलिक प्रबंधक दिगंबर महाडिक, आंचलिक प्रबंधक संजीव कुमार, , डीआरडीएचे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे, , उमेदचे सचिन चावरे,. माविमचे सोमनाथ लामगुंडे, आरसेडी संचालक दिपक वाडेवाले, आदी मान्यवर उपस्थित राहून मोलाचे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाची सांगता जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक. राम वाखरडे, , यांनी केली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राज्यस्तरीय बँकर्स समितीचे इम्तियाज अली, जिल्हा अग्रणी बँकेचे अधिकारी श्रीराम साठे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक, धाराशिव, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक, सांगली तसेच सोलापुर जिल्ह्यातील सर्व बँकांचे जिल्हा समन्वयक उपस्थित होते.

## लाभार्थ्यांनी बँकेविषयी तक्रार असेल

अधिकारी मिथुन पवार मो.नं. ९५२७३४११४७, विस्तार अधिकारी संदिप रणदिवे मो.नं.७३८७२९४३८३

माळशिरस - संरक्षण अधिकारी श्रीमती पी.एस.वावरे मो.नं.८७८८१५८२३०, विस्तार अधिकारी स्वप्नील वाघमारे मो.नं.९६३७९८३७३९

पंढरपूर - विस्तार अधिकारी अनंत शिंदे मो.नं.९०४९५२९७९७, विस्तार अधिकारी पांडुरंग कुंभार मो.नं.८२७५३०३१७३

दक्षिण सोलापूर - विस्तार अधिकारी ऋषीकेश जाधव मो.नं.८६००७९८८९९, संरक्षण अधिकारी मिलिंद घाडगे मो.नं.९०४९११३२८२

अक्कलकोट - विस्तार अधिकारी मृणाली शिंदे मो.नं.९४२०३५८३५५, संरक्षण अधिकारी एस.एस.कलशेट्टी मो.नं.९६६५६७३७४५

मंगळवेढा - पर्यवेशीका श्रीमती अनुराधा शिंदे मो.नं.९४२३५९१०४९, संरक्षण अधिकारी आर.आय.विजापूर मो.नं.९३२६५२७०४४.

तरी माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना बँकेशी संबंधित पैसे कपात व अन्य कोणतीही तक्रार असेल तर उपरोक्त संपर्क अधिकारी यांच्याशी त्यांच्या मोबाईलवर संपर्क साधावा, असे जिल्हा प्रशासनाच्या वतीने कळविण्यात येत आहे.

# आदिवासी बोलीतील विलक्षीत प्रेमकथा; मीमेटू बगा मंतीरु सुग्नी वल्द मंगरु

**दैनिक यशसिद्धी न्युज**

ादिवासी भागात प्रेमानूल्ली गाव समवेत 'बायो-बाबो' वाहून गेल्याने, मनानी खचलेला तरुण रुबाबदार मंगरु जंगलातच वास करु लागला. जंगलाजवळच दहा-बारा झुग्गीची (झोपडी) गोंडीटोला वस्ती वास्तवास राहते. एके दिवशी या वस्तीच्या चुडला पोरी (लहान मुली) व तरुण मुली आंघोळीसाठी तलावाच्या दिशेने निघाल्या, डोंगरातून तलावात पडणा-या खूपच सुंदर फेसांडलेला पाण्याचा नजराणा सुग्नीला बेधुंद करून आंघोळीसाठी मोहीत झाली, आकर्षित केल्याने सुग्नीसह सर्वच पोरी पाण्यात शिरल्या व आनंदोत्सवाने हसत खेळत रमल्या होत्या.



पण काळोखाचा ओघ, ढग काळवटलेले पाहून सर्व चूडला पोरी वस्तीकडे निघाल्या, तशी सुग्नी लक्ष करत लगबगीने पाण्याबाहेर निघून चमचमणारे कातडे व पानांनी कसेबसे अंग झाकून वाटेने निघत असतांना पावसाचा भलताच वर्षाव झाला, भिजलेली सुग्नी जंगलात झाडाच्या आधाराने थांबून आपले थरथरणारे शरीर न्याहाळत होती, पाऊस थांबेना, सुग्नी घाबरून गेली....

पोटाची भूक, मनाला शांती, शरीराला विसावा मिळावा अन् पावसापासून बचाव करण्यासाठी तरुण वयाचा दु:खी, कष्टाळलेला मंगरु जंगलातून रानमेवा व फळे, फळभाजी आपल्या झुग्गीकडे पावसामुळे धावत-पळत निघत होता, तो सुध्दा मोठा विशाल वृक्षापासून बचाव करण्यासाठी त्याच पिंपळाच्या झाडाखाली थांबला, तेथेच मागच्या बाजूला थरथर कापत, हळहळ करत तरुण सुंदर सूडोल गोरी वर्णाची पोर सुग्नी बसून होती, काही क्षणात मंगरु व सुग्नीची नजरानजर झाली, बोलण्याचा प्रयत्न, पण शब्द उमटत नव्हते.

तरी हिंमतीने मंगरु म्हणाला 'निम्मे के' (तुम्ही कोण)

'सुग्नी मनता' ती उच्चारली,

मंगरु- 'मीमेंटू बगा मंतरु'

'महे नार' म्हणून सुग्नी स्वत:बद्दल सांगत होती, तो मात्र तिला पाहून धूंद झाला होता.

तसीच सुग्नी म्हणाली 'मेमेंट ही पही'

मंगरु म्हणतो 'इके हूर्'..... बोलता-बोलता एकमेकांना पसंत करु लागले.

तेव्हा तो म्हणतो निवांत जीवाने माता (त्याने प्रेमाचा प्रस्ताव ठेवला)

ती एकदम हसून फूलली व प्रेमाचे बंध जूळून आले.

प्रेम बहरुन काही काळ लोटून गेला ते एकमेकांच्या अधून होवून भविष्याचा वेध घेण्यासाठी आधार हवा होता दोघांना. याच विचाराने...

मंगरु म्हणतो- 'नीम्मे नावातोंडे पेडंलू'

ती ' मंताने' (ती होकार देते) एकमेकांशी संवाद साधून, विचार करून काही दिवसांनी सुग्नीच्या गोंडीटोला येथे जाऊन दोघांनी जमलेल्या लोकांना आपल्या प्रेम प्रकरणाची विलक्षीत कथा सांगून मनातील ओझे कमी केले.

त्या गोंडीटोल्याची परंपरा जगावेगळीचजगावेगळीच, संध्याकाळ होताच जनावराचे कातडे लावलेले व पाने गुंडाळलेली आदिवासी समाजातील लोक भाले, दांडपट्टे व काठ्या घेवून गोटूल जवळ एकत्र शेकोटी पेटवून जमा झाले.

हुर्.... हुर्.... ले असा मोठा आवाज त्याठिकाणी दुमदुमला व लागलीच गोंडी देवपूजेला सुरुवात झाली, देवीला साक्षी ठेवत मंगरु व सुग्नी यांचा लग्न लावायचे ठरवत परंपरेप्रमाणे लग्न लावल्या गेले.

रे.... ना.... रे.... ना

रेरे .... ना.... रेरे.... ना असा गोंडी विवाह महोत्सव साजरा करतात. तर कधी मधी

किल्लं.... किल्लं.... आवाज करत हातातील काठ्या वगेरे जमीनीवर ठोकतात.

तपन तपे..... हिवरी-पिवरी....

हीला बासींग बांधा, करा नवरी....

अशा रितीरिवाजाने व परंपरागत लग्नाच्या बंधनात अडकतात. (सुग्नी वल्द मंगरु) सुग्नी संग मंगरु यांना तो जंगलातील आदिवासी समाज स्विकारतो, अन् त्यांच्या सुखी जीवनाला सुरुवात होते. यवनाची कळी उमलू लागते.

सुखी संसाराचा गाळा चालविण्यासाठी सुग्नी व मंगरु अनेक दिवसांनी खोलवर शिरतात. फळे फूले, भाज्या रानमेवा गोळा करण्यासाठी जाताना पाहून त्यांच्या मार्गावर गोंडीटोल्यातील लबाड-धूर्त, नराधमांनी मारण्याचा कट आधीच बांधला होता. त्या संधीचा आज सोने करु या बेताने जंगलातच सुग्नी आणि मंगरु यांना घेरले, मंगरुला भाले टोचत व काठ्या मारत देत वार करु लागले, तोच रक्तबंबाळ मंगरु जमिनीवर कोसळला पाहून सुग्नी ढसा-ढसा रडून गयावया करु लागली. संधी साधता काही नराधमांनी बळजबरीने निरदोष सुग्नीवर अतिप्रसंग व अत्याचार केला. त्यामुळे दोघांनाही वेदना सहन होत नव्हत्या, डोळ्यातून आसवांचा समुद्र वाहतच सुग्नी व मंगरु यांना प्राण सोडला, दोघेही जीवनातून मुक्त झाले, सुग्नी नेहमी मंगरुला म्हणायची असे आपण कोठेही गेलो तरी एकमेकांची साथ सोडायची नाही कदाचित नियतीला हेच मान्य असावे....!

**- मुन्नाभाई नंदागवळी,**
**येरंडी-बाराभाटी, जि. गोंदिया.**
**मो. ९७६४६७६४९९**
**(कथाकार साहित्याचे अभ्यासक आहेत.)**

## श्री गणरायाचे आगमन आनंद,

उत्साह-जोश यांनी ओसंडून जातो. यंदाही आपण हा उत्सव उत्साहात, जल्लोषात आणि पावित्र्य राखून साजरा करूया. श्री गणेशाची मनोभावे सेवा करतानाच, आपण सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेऊया. उत्सव ही संधी मानून आपण समाजातील गरजूंपर्यंत पोहचून, त्यांच्यापर्यंत शिक्षण, आरोग्य तसेच अशा विविध प्रकारच्या सेवा, मदत पोहचवण्याचा प्रयत्न करूया.श्रीगणेश आपल्याला निसर्ग पूजनाचा संदेश देतात. आपणही पर्यावरणाची काळजी घेऊया. निसर्ग संवर्धनाच्या उपक्रमांना पाठबळ देऊया. निसर्गाचं जतन-संवर्धन होईल, अशा प्रयत्नांत सहभागी होऊया. सामाजिक सलोखा हा महाराष्ट्राचा मानबिंदू आहे. त्यामुळे श्री गणेशाकडून सकारात्मक ऊर्जा, प्रेरणा घेऊन राज्यातील सामाजिक सलोखा-बंधुभाव परस्परांतील प्रेम-आदर भाव वाढीस लागेल, असे प्रयत्न करुया.

आपला महाराष्ट्र भारताचे 'ग्रोथ इंजिन' आहेच. श्रीगणेशाच्या कृपेनं आपला महाराष्ट्र विकसित भारताचेही नेतृत्व करेल, यासाठी एकजुटीने प्रयत्न करूया. श्री गणरायाचे आगमन महाराष्ट्रातील घरा-घरात सुख, समृद्धी घेऊन येईल. कुटुंबातील सगळ्यांच्या इच्छा-आशा-आकांक्षा पूर्ण करेल. विघ्नहर्त्याचं आगमन निसर्गाची अवकृपा, आणि अन्य सगळी विघ्न दूर करेल. श्री गणेशाचं अखंड कृपाछत्र कृपाछत्र महाराष्ट्रावर राहावे,अशी मनोकामना करून, मुख्यमंत्र्यांनी राज्यातील नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत.

## शिक्षकांनी विद्यार्थ्यांन शैक्षणिक ..

त्यांनी वापरलेल्या रंजक तंत्राबद्दलदेखील पंतप्रधानांना माहिती दिली. नियमित अध्यापनाच्या कामाबरोबरच त्यांनी केलेल्या सामाजिक कामाबद्दल शिक्षकांनी सांगितले. संवाद साधताना पंतप्रधानांनी शिकवण्याच्या कलेप्रती असलेले शिक्षकांचे समर्पण आणि इतक्या वर्षांत त्यांनी दाखवलेल्या उत्साहाची प्रशंसा केली. पुरस्कार विजेत्या शिक्षकांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून एकमेकांशी संपर्क साधावा आणि त्यांच्या शिकवण्याच्या पध्दतींचे आदान प्रदान करावे, जेणेकरून प्रत्येकाला अशा पद्धती शिकता येतील, त्या अंगीकारता येतील आणि त्याचा लाभ घेता येईल. शिक्षक देशाची अत्यंत महत्त्वाची सेवा करत असून आजच्या युवा वर्गाला विकसित भारताची निर्मिती करण्यासाठी तयार करण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे, असे पंतप्रधान म्हणाले. दरम्यान, गुरुवारी राजधानी दिल्लीमध्ये राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते देशातील ८२ शिक्षकांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# शासनाच्या लोकहिताच्या कल्याणकारी योजना माध्यमांनी नागरिकांपर्यंत पोहोचवाव्यात : मुख्यमंत्री



**दैनिक यशसिद्धी न्युज**

मुंबई : राज्य शासन हे लोकहिताचे निर्णय घेत आहे. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' प्रभावीपणे राबविली जात आहे. याबरोबरच शेतकरी, तरुण व ज्येष्ठांसाठीही योजना राबविण्यात येत आहेत. या कल्याणकारी योजना लोकांपर्यंत पोचविण्याचे काम माध्यमांनी करावे, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. सकाळ माध्यम समूहाच्या सरकारनामा या राजकीय साप्ताहिकाचा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज बीकेसीतील आयएनएस टॉवर येथील साम टीव्हीच्या कार्यालयात झाला. यावेळी सकाळचे मुख्य संपादक निलेश खरे, संपादक सम्राट फडणीस, कार्यकारी संपादक शीतल पवार, मुंबई सकाळचे संपादक राहुल गडपाले, सुरेंद्र पाटसकर यांच्यासह विविध आवृत्यांचे संपादक उपस्थित आहेत.

यावेळी साम टीव्हीच्या वतीने मुख्य संपादक श्री. खरे यांनी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांची मुलाखत घेतली.सकाळ माध्यम समूहाच्या नव्या सरकारनामा या साप्ताहिकाच्या शुभारंभास शुभेच्छा देऊन मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, राज्य शासन अनेक लोकोपयोगी व कल्याणकारी योजना राबवित आहे. या योजना लोकांपर्यंत पोहचणे आवश्यक आहे, त्यासाठी माध्यमांनीही सहकार्य करावे. तसेच बातम्या देताना माध्यमांनी दोन्ही बाजू जाणून घेऊन वस्तुनिष्ठ माहिती लोकांपुढे मांडावी.गेल्या दोन वर्षात राज्य शासनाने अनेक प्रकल्पाना चालना दिली तर अनेक नवीन प्रकल्प सुरू केले. वॉर रूमच्या माध्यमातून या प्रकल्पांवर सनियंत्रण ठेवले.

समृद्धी महामार्ग, अटल सेतू, सागरी किनारा मार्ग, मेट्रो अशा प्रकल्पामुळे वाहतूक जलद झाली असून वेळ व इंधन वाचण्यास मदत होत आहे. लवकरच मेट्रो -३ सुरू होणार असून यामुळे मुंबईतील वाहतूक कोंडी कमी होणार असून लाखो लोकांचा प्रवास सुखकर होणार आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, विकास प्रकल्पांना चालना देतानाच दुसरीकडे आम्ही अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुख्यमंत्री वयोश्री, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, मुख्यमंत्री लेक लाडकी व लखपती दिदी अशा योजना राबविण्यात येत आहेत.

राज्यातील सर्वसामान्य व मध्यमवर्गीय कुटुंबाचा विचार करून या योजना सुरू केल्या आहेत. राज्यातील शेतकरी, महिला, तरुण व ज्येष्ठ अशा सर्व घटकांचा विचार हे शासन करत आहे. या सर्व योजनासाठी निधीची तरतूद करून ठेवण्यात आली आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी या वर्षी ३३ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेत लाडक्या बहिणींना देण्यात येणाऱ्या लाभाच्या रकमेत पुढील काळात वाढ करण्यात येईल. ही योजना बंद होणार नाही, असा विश्र्वास ही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.

# राज्य शासनाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना, युनिफाईड निवृत्ती योजनेसह सुधारित निवृत्तीवेतन योजनेतून एका पर्यायाची निवड करता येणार

मुंबई : राज्यातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या नव्याने जाहीर झालेल्या युनिफाईड निवृत्तीवेतन योजना, राष्ट्रीय पेन्शन योजना आणि राज्य शासनाने अर्थसंकल्पीय अधिवेशनात जाहीर केलेल्या सुधारित निवृत्ती योजनेपैकी एका पर्यायाची निवड करण्याची संधी देण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. मुख्यमंत्री यांच्या या निर्णयावर विविध अधिकारी आणि कर्मचारी संघटनांनी सहमती दर्शवत संप संस्थगित करण्याची घोषणा केली. राज्य शासनाचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. या बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव आय. एस. चहल , मुख्यमंत्र्याचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे , वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता , सामान्य प्रशासन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव व्ही. राधा, महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे सल्लागार ग.दी. कुलथे, अध्यक्ष विनोद देसाई, अखिल भारतीय राज्य सरकारी कर्मचारी महासंघाचे सरचिटणीस विश्र्वास काटकर आणि महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे सरचिटणीस भाटकर यांच्यासह कर्मचारी संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन येथे राष्ट्रीय शिक्षक दिन साजरा..




**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

रेणापूर/सुधाकर रणदिवे : ५/९/२०२४ रोजी रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन रेणापूर ता. रेणापूर जि.लातूर येथे शिक्षक दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. छात्र अध्यापकानी प्राध्यापकांना शुभेच्छा देऊन सन्मान केला.या वेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून शिवाजी कॉलेज रेणापूर येथील सुप्रसिद्ध वक्तया प्रा.डॉ क्रांती विठ्ठल मोरे उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य, डॉ. कैलास मोटे हे होते.या वेळी प्रा.शशिकांत चिलरगे,प्रा.डॉ. हिरकन शेटकर,प्रा.रतन लहाने,प्रा उमेश रणदिवे ,प्रा. रमाकांत गायकवाड, राधिका माने, ग्रंथपाल मनीषा लातूरकर , व बी एड चे सर्व छात्र अध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन छात्र अध्यापिका कु, सायली कनकुरे यांनी केले प्रास्ताविक प्रा. डॉ. हिरकन शेटकर यांनी तर आभार प्रदर्शन छात्र अध्यापिका कु .प्राजक्ता लिंबाळकर यांनी केले.

# 'मुख्यमंत्री योजनादूत' उपक्रमासाठी अर्ज करण्याचे आवाहन

मुंबई : शासनाच्या विविध योजनांची सर्वसामान्य नागरिकांना माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक उमेदवारांनी www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रत्येक ग्रामपंचायत पातळीवर एक तर शहरी भागात प्रत्येक पाच हजार लोकसंख्येमागे एक अशा पद्धतीने राज्यात एकूण ५० हजार योजनादूतांची सहा महिन्यांसाठी निवड केली जाणार आहे. या योजनादूतांना दरमहा १० हजार रूपये मानधन दिले जाणार आहे. हे योजनादूत शासनाच्या लोककल्याणकारी योजनांबाबत नागरिकांना माहिती देतील.

उमेदवारास संगणक ज्ञान असावे. त्याच्याकडे अद्ययावत मोबाईल (स्मार्ट फोन) आणि आधारसंलग्न बँक खाते असणे आवश्यक आहे.मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज, आधार कार्ड, पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्यादाखल कागदपत्रे / प्रमाणपत्र इ., अधिवासाचा दाखला. (सक्षम यंत्रणेने दिलेला), उमेदवाराकडे आधार जोडणी असलेल्या बँक खात्याचा पुरावा, पासपोर्ट आकाराचा फोटो, हमीपत्र (ऑनलाईन अर्जासोबतच्या नमुन्यामधील) नियुक्तीवेळी सादर करणे आवश्यक आहे. १३ सप्टेंबर २०२४ पर्यंत इच्छुक उमेदवारांना www.mahayojanad oot.org या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल.

# पंढरपुरात पक्षाचा आमदार नसला तरी श्रीकांत शिंदे यांच्यासारख्या निष्ठावंतामुळे पक्ष मजुबत : ना.अदिती तटकरे



**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधीः महायुती म्हणूनच आपणाला निवडणूकीला सामोरे जायचे आहे असे असले तरी संघटनात्मक कामांमध्ये कुठेही कमतरता येवू नये हे उद्दिष्ट ठेवून तुम्ही काम करत आहात. आज आयपीएस, आयएएस असतील किंवा वेगवेगळया क्षेत्रात काम करणाऱ्यांना शारदाई पुरस्कार देवून आपण सन्मानित करीत आहात यामध्ये काही पुरूष अधिकारी आहेत व महिला अधिकारी देखील आहेत आणि या पुरस्कारामागचे उद्दिष्ट आहे की आपल्या तालुक्यातून लगतच्या तालुक्यातून जितके कर्तृत्ववान व्यक्ती आहेत त्यांना आपण पुरस्काराच्या माध्यमातून सन्मानित करीत असतो.ज्यांच्या नावाने आपण पुरस्कार ठेवलेला आहे

त्यांनी सामाजिक कार्यामध्ये १९५० ते १९७० च्या दशकापर्यंत उल्लेखनीय कार्य आहे त्या आदरणीय पवार साहेबांच्या मातोश्री शारदाई व अजितदादांच्या आजी त्या त्यांनी सरपंच म्हणून काम केले वेगवेगळ्या पदांवर त्यांनी काम केले अगदी एसटीने प्रवास करून त्या आपले काम व आपली जबाबदारी पार पाडत होत्या आज महिलांना ५० टक्के आरक्षण आहे पण त्या काळात सरपंच म्हणून काम करीत होत्या त्या आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी आहेत त्यामुळे पुढच्या काळात तुमच्या पैकी कुणाला जर अशी संधी मिळाली तर तुम्ही उल्लेखनीय काम कराल अशी अपेक्षा व्यक्त केली. पंढरपुरात आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा आमदार नसला तरी श्रीकांत शिंदे यांच्यासारख्या निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या जीवावर आज पक्ष मजबुत आहे असे प्रतिपादन राज्याचे महिला व बाल कल्याण विभागाच्या मंत्री ना.अदिती तटकरे यांनी केले.

पंढरपूर येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री मा.ना.अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आदर्श माता व कर्तृत्ववान महिलांचा सन्मान मातोश्री शारदाई पुरस्कार २०२४ व गरजू शालेय मुलींना सायकल वाटप राज्याच्या महिला व बालविकास मंत्री मा.ना.अदिती तटकरे यांच्याहस्ते गुरूवार दि.५ सप्टेंबर २०२४ रोजी श्रीराम मंगल कार्यालय इसबावी पंढरपूर येथे संपन्न झाला. सदरचा कार्यक्रम राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस श्रीकांत शिंदे यांनी आयोजित केला होता.

यावर्षीचे पुरस्कार आदर्श माता श्रीमती मंगलताई भीमराव महाडिक (खा.धनंजय महाडिक मातोश्री), श्रीमती मालनबाई वसंतराव काळे (चेअरमन कल्याणराव काळे यांच्या मातोश्री), सौ शोभाताई शिवाजीराव काळुंगे (मुख्य कार्यकारी अधिकारी राजलक्ष्मी गायकवाड यांच्या मातोश्री), श्रीमती सुशीलाताई हरिभाऊ अक्कलकोटे (बार्शीचे नगरसेवक नागेगश अक्कलकोटे यांच्या मातोश्री), मुमताज रशीद शेख (महाराष्ट्र केसरी पै.सिकंदर शेख यांच्या मातोश्री), सौ ललिता लक्ष्मण चव्हाण (आय.ए.एस.राहुल चव्हाण यांच्या मातोश्री), श्रीमती सुलोचना मल्हारी मोकाशी (प्रसिध्द बाधंकाम व्यावसायिक चंद्रशेखर मोकाशी यांच्या मातोश्री) यांना यावर्षीचे शारदाई पुरस्कार प्रदान करण्यात आले.

या कार्यक्रमास राष्ट्रवादीचे युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, प्रशांत कदम, प्रवक्ते उमेश दादा पाटील, समाधान काळे, अरुण कोळी, अनिल अभंगराव, गणेश अधटराव, वर्षा शिंदे, उज्वला पाटील, माजी नगरसेवक मोहमद उस्ताद, महेश कुलकर्णी, अभिषेक आव्हाड, अक्षय भांड, हरिदास रणदिवे , सायरा शेख, संगीता जोगधनकर , चित्रा कदम , किरण माशालकर, साधना राऊत, अमोल परबतराव, सूरज पेंडाल, सुदर्शन कादे, प्रदीप तांडेल, दत्तात्रय कांबळे व विजय अभंगराव उपस्थित होते.

राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस श्रीकांत शिंदे म्हणाले की, गेली ४ वर्ष सोलापूर जिल्ह्यातील कर्तृत्ववान महिलांना शारदाई पुरस्कार आणि ज्या मुली लांब पल्लयावरून येतात त्यांना सायकल वाटप करण्यात येते. पवार कुटूंबावर कायमच निष्ठा ठेवून काम करीत असताना कोणतीही संस्था नाही, पद नसतानाही अजितदादा यांच्यासारखा नेता माझ्यापाठीशी उभा राहतो कारण निष्ठेचे उदाहरण सोलापूर जिल्ह्यात बघायचे झाले किंवा पंढरपूरात बघायचे झाले तर अजितदादांचा कार्यकर्ता म्हणून अनेकजण पाहतात. पुरस्कार देण्याचा हेतू म्हणजे ज्या शारदाईंनी शरदचंद्र पवार साहेबांसारखा जाणता राजा घडविला त्याच शारदाई यांच्या नावे हा पुरस्कार देताना मला अभिमान वाटतो पवार कुटूंबावर कायमच प्रेम करत असताना पवार कुटूंबाचे नाव पाठीमागे असताना जी कामाची ओळख व आणि निष्ठेला किंमत देण्याचे अजितदादांनी कायमच माझ्यावर पाठीवर थाप देण्याचे काम केले असे श्रीकांत शिंदे यांनी सांगितले.

राष्ट्रवादीचे प्रदेश प्रवक्ते उमेश पाटील म्हणाले की, महिला व बालकल्याण खात्याच्या मंत्री ना.अदिती तटकरे यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या खात्याकडून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची प्रक्रिया झाली आणि ती सुलभ केली संपूर्ण यंत्रणेला काम करून घेण्याचे कसब म्हणजे त्यांच्या मंत्री पदाच्याच कारकिर्दीतील नव्हे तर महाराष्ट्राच्या इतिहासातील एक ऐतिहासिक योजना अदितीताई यांच्या खात्याने लागू केली आदरणीय अजितदादांनी यासाठी पुढाकार घेतला केवळ मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनाच नव्हे तर वर्षातून ३ सिलेंडर मोफत देण्याचा निर्णय असेल किंवा मुलींसाठी पहिली ते डिग्रीपर्यंत मोफत शिक्षण देण्याचा महत्वाचा निर्णय अजितदादांमुळे या सरकारच्या माध्यमातून झाला असल्याचे उमेश पाटील यांनी सांगितले.

राष्ट्रवादी युवकचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण म्हणाले की, मी अनेक वर्ष झाले श्रीकांत शिंदे यांचे कार्यक्रम पाहत आलेलो आहे. शारदाई पुरस्काराच्या निमित्ताने तुम्ही छोटीशी सुरूवात केली होती आणि त्या रोपट्याचे रूपांतर आज झाडात होत असल्याचे पाहत आहे. खरं तर ज्या नेतृत्वाच्या नेतृत्वात आपण काम करीत असतो त्या नेतृत्वाने आपणाला शिकवण दिली आहे ८० टक्के समाजकारण व २० राजकारण आणि त्या शिकवणीवर तुम्ही खरे उतरला आहात. आज ग्रामीण भागातील मुली शिक्षणाकरिता शहरात याव्यात आणि शिक्षणासाठी येत असताना त्यांना कोणतीही अडचण होवू नये यासाठी यासाठी तुम्ही ज्या छोट्या मुलींसाठी सायकल वाटपाचा कार्यक्रम ठेवला आहे आपल्या नेतृत्वाने सांगितले आहे की समाजातील शेवटच्या घटकाचा विकास झाले पाहिजे यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही असे सुरज चव्हाण यांनी सांगितले.

सदरचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सूरज राठी, निखिल नेहतराव ,अभिनव शिंदे,शुभम पवार,अनिकेत नेहतराव यांनी परिश्रम घेतले.

# कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात शिक्षक दिन साजरा

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधीः महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित सौ. सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, गिरीजामाता प्राथमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय, मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अक्कलकोट यांच्यावतीने डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती ५ सप्टेंबर शिक्षक दिन म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. शिक्षक दिनानिमित्त दहावीचे विद्यार्थी आज एक दिवस संपूर्ण शाळा मुख्याध्यापक , शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी म्हणून विद्यार्थी शिक्षकांच्या नेतृत्वात एकदिवशीय शाळा चालवण्यात आली. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. आपल्या जीवनामध्ये एखादा आवडता शिक्षक आणि त्यामुळे जीवनाला कलाटणी कशी मिळाली, याबद्दल आपले स्वतःचे अनुभव विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून मांडले. त्याचबरोबर सेमी विभागातील इयत्ता चौथी व सातवीच्या मुलींनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन चरित्रावर आधारित एक सुंदर डान्स परफॉर्मन्स सादर केला. त्याला विद्यार्थ्यांनी खूप चांगला प्रतिसाद दिला.



यावेळी संस्थेचे ज्येष्ठ संचालक मा .श्री मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी विद्यार्थ्यांना आज शिक्षक दिनाचे महत्त्व सांगितले व शिक्षक हा विद्यार्थी जीवनामध्ये किती महत्त्वाचा असतो हे अनेक प्रसंगाच्या माध्यमातून त्यांनी मुलांना समजून सांगितले.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी शिक्षक वेदांती मसलेकर हीने केली सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मार्गदर्शक म्हणून सांस्कृतिक विभागाचे प्रमुख निशिगंधा कोळी व कल्पना स्वामी मॅडम यांनी केले.यावेळी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, शिक्षण विभागाच्या सीईओ सौ .रूपाली शहा, जुनिअर कॉलेज विभाग प्रमुख पुनम कोकळगी, सीनियर कॉलेजचे प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, दिगंबर जगताप, पूजा कडबगावकर, राजकुमार गवळी, सिद्धाराम पाटील, श्रीदेवी मायनाळे, शिवानंद पुजारी, खंडेराव घाटगे आदी शिक्षक उपस्थित होते. सर्व उपस्थितांचे आभार इयत्ता दहावीतील विद्यार्थी शुभांगी पाटील यांनी केले.

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षाचा विक्रम; २ वर्षं २ महिन्यांत ३२१ कोटींहून अधिक रुपयांचे अर्थसहाय्य वितरित

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

मुंबई : मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीने गेल्या २ वर्षं २ महिन्यात ३२१ कोटींहून अधिक रुपयांचे अर्थसहाय्य वितरित करुन तब्बल ४० हजाराहून अधिक गंभीर रुग्णांचे वाचविण्याचा विक्रम केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली गोरगरीब – गरजू रुग्णांना दुर्धर आणि महागड्या शस्त्रक्रियांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातून थेट अर्थसहाय्य केले जात आहे. मुख्यमंत्री कार्यालयात आलेला एकही रुग्ण हा मदतीविना वंचित राहता कामा नये, या मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार कक्षाचे काम सुरु आहे. याचाच परिणाम म्हणून मु.वै.स.क. मंत्रालय, मुंबई कार्यालयामधून तब्बल २९२ कोटींपेक्षा अधिक तर मु.वै.स.क.,नागपूर कार्यालय मधून २८ कोटी रुपयांचे अर्थसहाय्य वाटप करण्यात आले आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून मदत मिळवणे सोपे होण्यासाठी कक्षातर्फे विशेष पाऊले उचलण्यात येत आहेत. आता मदत मिळवण्यासाठी मुंबईत मंत्रालयात येण्याची आवश्यकता राहीलेली नाही. सहायता कक्षाच्या ८६५०५६७५६७ या टोल फ्री क्रमांकावर कॉल करून थेट मोबाईलवर अर्ज उपलब्ध करुन दिला जात आहे.

तसेच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी मध्ये रुग्णालय अंगीकृत ( शारिपिशश्र ) करण्याची आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी मधून रुग्णांनी अर्थसहाय्य मिळविण्याची प्रक्रिया संपूर्णतः निःशुल्क आहे. याबाबत जनजागृती करुन जास्तीत जास्त रुग्णालये या योजनेत जोडण्यात येत आहे. मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या सूचनेनुसार मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी मध्ये अँजिओप्लास्टी, बायपास सर्जरी, कर्करोगावरील शस्त्रक्रिया, केमोथेरपी, डायलिसिस, जन्मतः मूकबधीर लहान मुलांसाठी अत्यावश्यक असणारी कॉकलीयर इनप्लांट शस्त्रक्रिया, सर्व प्रकारचे अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, विद्युत अपघात, भाजलेले रुग्ण, जन्मतः लहान मुलांच्या हृदयशस्त्रक्रिया आदींचा समावेश करण्यात आला आहे. दुर्धर आजारांनी ग्रस्त रुग्णांनी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्ष प्रमुख मंगेश नरसिंह चिवटे यांनी केले आहे.

अवघ्या एक वर्षाची 'दुवा' बनली मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाची ब्रॅण्ड ॲम्बेसेडर

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षाच्या ब्रॅण्ड म्बेसेडरपदी अवघ्या एक वर्षाच्या 'दुवा' नावाच्या चिमुकलीची निवड करण्यात आली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील फहरीण मकूबाई आणि सादिक मकूबाई या मुस्लिम दांपत्याच्या पोटी जन्माला आलेल्या अवघ्या १३ दिवसांच्या बाळाचे प्राण मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या लाखमोलाच्या मदतीमुळे वाचले होते.

# टेंभूर्णीच्या देशमुख बंधुंनी हाती घेतली तुतारी

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

टेंभुर्णी/प्रतिनिधीः रावसाहेब देशमुख व सूरज देशमुख या दोघा बंधुंनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत प्रवेश केला. यावेळी देशमुख बंधुंनी जोरदार शक्तिप्रदर्शन करून आमदार बबनराव शिंदे गटाला चांगलाच धक्का दिला आहे.

या पक्ष प्रवेश सोहळ्यास माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, खासदार धैर्यशील मोहितेपाटील, अप्पासाहेब जगदाळे, बाबूराव गायकवाड, शिवतेजसिंह मोहिते-पाटील, अनिल सावंत, नागेश फाटे, संजय कोकाटे, शिवाजी कांबळे, दादासाहेब साठे, विलास देशमुख, रवींद्र पाटील, गणेश पाटील, अरुण आसबे, धनंजय डिकोळे, संजय पाटील-घाटणेकर, अरुण तोडकर, भारत पाटील, बाळासाहेब पाटील, सुवर्णा शिवपुजे, रत्नप्रभा जगदाळे, ऋतुजा सुर्वे, मयुर काळे यांच्यासह महाविकास आघाडीतील नेते उपस्थित होते. यावेळी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील म्हणाले, माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरात सर्वत्र परिवर्तनाची लाट निर्माण झाली आहे. माढा लोकसभा मतदारसंघात तुम्ही बदल घडवून आणलात. त्यामुळे सरकार जागे झाले आणि घाबरले.

घाबरलेल्या सरकारने तिजोरीचे दार उघडले नाही तर ते काढून बाजूला ठेवले आहे. आज म्हणेल त्या गोष्टी तुम्हाला देण्यास सरकार तयार झाले आहे आणि हे घाबरलेले सरकार आता निवडणुका कशा पुढे ढकलता येतील, यासाठी प्रयत्न करत आहे. आज महाराष्ट्रातील आमच्या लाडक्या भगिनी सुरक्षित नाहीत. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी घृणास्पद घटना समोर येत आहेत.

या सरकारला महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था सांभाळता येत नाही, हे या सरकारचे सगळ्यात मोठे अपयश आहे. अवघ्या आठ महिन्यात महाराजांचा पुतळा कोसळला. महाराजांचा इतिहास पुसण्याचा विडाच या सरकारने उचलला असल्याचा आरोप पाटील यांनी केला. दरम्यान, सूरज देशमुख म्हणाले, आजपासून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षासाठी आयुष्यभर संपूर्ण ाकदीने काम करत राहणार आहे.



माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्यांच्या पक्ष प्रवेशासाठी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील उपस्थित राहिले, त्यांचे ऋण आयुष्यभर फिटणार नाही.

# वंचित बहुजन आघाडीच्या इंदापूर तालुका अध्यक्षपदी संतोष मिसाळ

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

इंदापूर/अतुल सोनकांबळे : वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. बाळासाहेब तथा प्रकाश आंबेडकर प्रदेशाध्यक्ष रेखाताई ठाकूर पुणे जिल्हा प्रभारी प्राध्यापक किसन चव्हाण सर यांच्या आदेशाने



वंचित बहुजन आघाडीच्या इंदापूर तालुका अध्यक्षपदी संतोष मिसाळ यांची निवड करण्यात आली आहे. संतोष मिसाळ हे गेल्या वीस वर्षापासून वेगवेगळ्या सामाजिक संघटनांमध्ये काम करत असून त्यांना आज खऱ्या अर्थाने न्याय मिळाला असे मिसाळ यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. तसेच अध्यक्षपदाच्या निवडीचे पत्र पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष माननीय रेखाताई ठाकूर यांच्या सहीचे नुकतेच मिळाले असून. यावेळी बोलताना मिसळ म्हणाले की पक्षाने माझ्यावरती टाकलेली जबाबदारी मी प्रामाणिकपणे पार पाडेल व पक्षाचे ध्येयधोरण विचारधारा गावोगावी खेडयापाडयातील तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करीन असे यावेळी सांगितले. तसेच पक्षाचे जिल्हाध्यक्ष माननीय राजकुमार साहेब तसेच जिल्हा कार्यकारणीतील सर्व पदाधिकाऱ्यांचे मिसळ यांनी आभार मानले

# दुधनी नगरपरिषदेत कायमस्वरूपी मुख्याधिकारी नेमण्यात यावे : झळकी

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

दुधनी/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथील नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्या गेल्या वर्षी बदली झाल्याने येथे कायमच्या मुख्याधिकार्या विना अनेक विकास कामासाठी अडचण होत आहे.त्यामुळे कायमस्वरुपी मुख्याधिकारी नेमावे.अशी मागणी रिपाइं जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांनी केली आहे.




सध्या अक्कलकोटचे मुख्याधिकारी रमाकांत डाके यांनी दुधनी चे अतिरिक्त पदभार स्विकारली आहे. दुधनी हा शहर पंधरा हजार लोकसंख्येच्या गाव आहे.आणी अक्कलकोट शहरही भरमसाठ वाढल्याने दोन्ही गावांचे विकासकामे व स्वच्छता,पिण्याचे पाणीचे सोई-सुविधा सांभाळणे कठीण होत आहे.तरी लवकरात लवकर स्वतंत्र मुख्याधिकारी नेमण्यात यावे अशी मागणी मा. प्रशाशनाधिकारी सोलापूर व मा. जिल्हाधिकारी सोलापूर यांच्या कडे केली आहे.आमच्या प्रतिनिधीस बोलतांना झळकी म्हणाले की,स्वतंत्र मुख्याधिकारी नेमण्यात यावे. अन्यथा नगर परिषद दुधनी कार्यालया समोर उपोषणास बसण्याचे इशारा दिला आहे. याप्रसंगी रिपाइंचे दुधनी शहर अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी व मुस्लिम आघाडी चे शहर अध्यक्ष महेदिमिया जिडगे उपस्थित होते.

# उद्या स्वाभिमानी शिक्षक व कर्मचारी महासंघाच्या वतीने पुरस्कार वितरण सोहळा

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधीः स्वाभिमानी शिक्षक व कर्मचारी महासंघ महाराष्ट्र राज्य व मंत्रालय समन्वय समिती मुंबई यांचे संयुक्त विद्यमाने शिक्षक दिनाचे औचित्य साधून राज्यस्तरीय आदर्श शाळा, आदर्श मुख्याध्यापक, आदर्श शिक्षक आदर्श कर्मचारी पुरस्कार वितरण सोहळा रविवार दिनांक ८ सप्टेंबर रोजी सिंहगड इंजिनिअरिंग कॉलेज केगाव सोलापूर येथे सकाळी ११ वाजता होणार असल्याचे संयोजक बापूसाहेब आडसुळ सदस्य मंत्रालय समन्वय समिती मुंबई, प्रदेशाध्यक्ष स्वाभिमानी शिक्षक व कर्मचारी महासंघ महाराष्ट्र राज्य यांनी दिली. या पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये १०० पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार असून सदर पुरस्कार वितरण सोहळयासाठी राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दिपक केसरकर, शिवसेना जिल्हाप्रमुख मनिष काळजे ,माजी शिक्षण मंत्री लक्ष्मण ढोबळे, शिक्षणाधिकारी माध्यमिक सचिन जगताप, शिक्षणाधिकारी प्राथमिक कादर शेख, सहाय्यक पोलीस आयुक्त राजन माने, प्रदेश उपाध्यक्ष शिवाजीराव व्हनकडे, तसेच सर्व प्रमुख पदाधिकारी जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष व सर्व कार्यकारिणी सदस्य यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

# चंदन मारुती निर्मळे यांची वैद्यमापन अधिकारी पदी निवड





पत्रकार नामदेव निर्मळे

टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ सेवेतील माजी बसवाहक मारुती आनंदा निर्मळे यांचे चिरंजीव चंदन मारुती निर्मळे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण होऊन यांची वैद्यमापन अधिकारी पदी निवड झाल्याबद्दल सत्कार करताना वडील मारुती निर्मळे,आई मनीषा निर्मळे, माजी ग्रामपंचायत सदस्य चंद्रकांत निर्मळे, रुक्मिणी निर्मळे, लक्ष्मी निर्मळे व संपूर्ण निर्मळे परिवार, आर्नरी कॅप्टन रमेश निर्मळे, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.विष्णू निर्मळे,पत्रकार नामदेव निर्मळे आदींनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

# राजधानी येथील उद्योग समागमात उद्योग मंत्री उदय सामंत यांचा सहभाग

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

नवी दिल्ली : नवी दिल्लीतील यशोभूमी, द्वारका येथे रोजी केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांच्या अध्यक्षतेखाली उद्योग संवर्धन आणि अंतर्गत व्यापार विभागामार्फत उद्योग समागमाचे आज आयोजन करण्यात आले होते. या समागमात देशातील सर्व राज्यांचे उद्योग मंत्री आणि प्रतिनिधी सहभागी झाले होते. महाराष्ट्र सरकारचे प्रतिनिधित्व करताना राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत या कार्यक्रमात मध्ये उपस्थित होते.या समागमात औद्योगिक वाढ, सामान्य आव्हाने आणि भविष्याच्या दिशा यावर चर्चा करण्यात आली. या चर्चेदरम्यान, मंत्री उदय सामंत यांनी महाराष्ट्रातील औद्योगिक विकासाचा आढावा मांडला आणि राज्यातील विकासाच्या अपार संधींचे सादरीकरण केले. त्यांनी राज्यातील विविध गुंतवणुकीच्या प्रकल्पांची सविस्तर माहिती केंद्रीय मंत्र्यांना यावेळी दिली.



उद्योग मंत्री सामंत यांनी कार्यक्रमानंतर महाराष्ट्र सदन येथे पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी बोलतांना त्यांनी सांगितले की, महाराष्ट्राने पुन्हा एकदा फॉरेन डारेक्ट इनवेस्टमेंटमध्ये (एफडीआय) प्रथम स्थान मिळवले आहे. तसेच, केंद्र शासनाने महाराष्ट्राला दिलेल्या विविध प्रकल्पांचा आढावा केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी घेतले असल्याची माहिती दिली.

श्री. सामंत म्हणाले, देशातील सर्वांत मोठे आणि जगातील दहाव्या क्रमांकाचे वाढवण बंदर विकसित करण्यासाठी केंद्र सरकारने ७६ हजार कोटी रुपये मंजूर केले आहेत, ज्याचे नुकतेच भूमिपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. यासोबतच, कोकणातील दिघी पोर्टला इंडस्ट्रीयल सिटी म्हणून मान्यता मिळाली असून, या प्रकल्पात ३८ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे आणि सुमारे १ लाख रोजगाराच्या संधी निर्माण होतील, अशी माहिती दिली .उद्योग मंत्री सामंत यांनी पुढे माहिती दिली की, कॅबिनेट बैठकीत पनवेल येथे ८३ हजार कोटी रुपयांचा सेमीकंडक्टर प्रकल्प उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे. याशिवाय, स्कॉडा कंपनी १२ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असून, रेमण्ड टेक्सटाईल्स २०० कोटी रुपयांचा प्रकल्प उभारणार आहे. एकूणच, महाराष्ट्रात १.५० लाख कोटी रुपयांच्या प्रकल्पांना मान्यता मिळाली असल्याचे त्यांनी सांगितले.

केंद्र आणि राज्य शासन एकत्रितपणे महाराष्ट्रात उद्योग वाढविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. राज्यात लेदर आणि इलेक्ट्रॉनिक क्लस्टर, तसेच अमरावतीचा टेक्सटाईल पार्क यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होतील. तसेच, कोकणात डिफेन्स क्लस्टरच्या उभारणीसाठी लवकरच एमओयू केले जाणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

### साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे महामंडळाच्या विविध योजनांसाठीअर्ज करण्याचे आवाहन

मुंबई : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळामार्फत सुविधा कर्ज योजना, महिला समृद्धी योजना, शैक्षणिक कर्ज योजना अशा विविध योजना राबविल्या जातात. या योजनांकरिता दि. १५ ऑक्टोबर २०२४ पर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन महामंडळाच्या मुंबई शहर-उपनगर जिल्ह्याच्या जिल्हा व्यवस्थापक वैशाली मुडळे यांनी केले आहे. सुविधा कर्ज योजना - कर्ज मर्यादा रक्कम ५ लाख रुपये, महिला समृद्धी योजना - कर्ज मर्यादा १. ४० लाख व शैक्षणिक कर्ज योजना कर्ज मर्यादा देशांतर्गत अभ्यासक्रमासाठी ३० लाख रुपये व परदेशातील अभ्यासक्रमासाठी ४० लाख रुपये आहे. या कर्ज योजनेंतर्गत लाभार्थींकरिता भौतिक उद्दिष्ट प्राप्त झाले आहे.या कर्ज योजनांचा लाभ घेण्यासाठी दि. १५ ऑक्टोबर २०२४ पर्यंत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ मुंबई, गृहनिर्माणभवन, कलानगर, तळमजला, रूम नं ३३, बांद्रा (पू) मुंबई-५१ या पत्त्यावर अर्ज करावे, असे महामंडळाने प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

# विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षकांचा मोलाचा वाटा : संचालक डॉ. केदारनाथ काळवणे

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

पंढरपूरः 'आयुष्यात उत्तमरित्या करीअर करायचे असेल तर शिक्षकांनी आणि मोठ्यांनी सांगितलेल्या मार्गावर चालणे हे फायदेशीर ठरते. आपल्यावर संस्कार करणाऱ्या शिक्षकांचे ऋण आपण आयुष्यभर जपले पाहिजेत. पतंग कितीही उंच उडवा परंतु त्यांची दोरी आपल्या हातामध्ये असते. त्याप्रमाणे जगात ज्ञान प्रचंड आहे परंतु मेंदूचा वापर करून फायद्याचे तेवढे ज्ञान घ्यायचे असते. जो मेंदूचा वापर अधिक करतो तोच हुशार बनतो. यासाठी स्वतःभोवती घडणाऱ्या गोष्टी आपण चिकित्सकपणे तपासल्या पाहिजेत. आपले व्यक्तिमत्व घडवण्यात शिक्षकांचा मोलाचा वाटा असतो. आपले विचार, वर्तन, वागणे, बोलणे हे सर्व आपल्या व्यक्तिमत्त्वातून दिसून येत असते. यासाठी सत्य, अहिंसा, प्रेम, न्याय, मानवता सार्वजनिक मूल्ये समजून घेऊन त्या दिशेने वाटचाल करणे गरजेचे आहे. ऑनलाइन मिळते ती माहिती असते पण ज्ञान हे वर्गात शिक्षकांकडूनच मिळत असते. जे विद्यार्थी नम्रतेने राहतात ते विद्यार्थी आयुष्यात खूप मोठे होतात. आपल्याकडे कितीही ज्ञान असो, जर नम्रताच अंगी नसेल तर त्या अथांग ज्ञानाचा उपयोग नाही. नम्रता ही शिक्षकांकडून मिळत असते. एकूणच विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षकांचा मोलाचा वाटा असतो.' असे प्रतिपादन पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे यांनी केले.



गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या भव्य खुल्या रंगमंचामध्ये भारतरत्न डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांची १३६वी जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त आयोजिलेल्या 'शिक्षक दिना'च्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे हे मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वेरीचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे हे होते. महाराष्ट्र गीत आणि स्वेरीच्या सुमधुर गीताने व डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाला सुरवात झाली. संदेश फलकावरून संचालक डॉ. काळवणे यांनी 'मेहनत करा, यश तुमचेच आहे' हा संदेश विद्यार्थ्यांना दिला. प्रास्ताविकात संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी पाहुण्यांचे स्वागत करून 'शिक्षकांचे समाजाच्या प्रगतीमध्ये असणारे योगदान स्पष्ट करताना म्हणाले की, 'विद्यार्थी हा केवळ विद्यार्थी नसून तो शिक्षकांच्या भूमिकेत देखील आहे. त्यामुळे त्याला आदराचे स्थान दिले जाते. विद्यार्थ्यांनी करिअर घडवताना भावनीकतेला थारा देवू नये तसेच विद्यार्थी व शिक्षक यांचे आपसातील संबंध हे आदराचे असावे' असे सांगून त्यांनी विद्यार्थी दशेतील अनुभव सांगितले. पुढे बोलताना संचालक डॉ. काळवणे म्हणाले की, 'विद्यार्थ्यांमध्ये न्यूनगंड असतो त्यामुळे आपल्या विकासाला अडथळा येतो यासाठी न्यूनगंड बाजूला झटकून कार्य केले पाहिजे. जर आपले मन परिवर्तन करायचे असेल तर वाचन आवश्यक आहे. कारण वाचन, लेखन आणि भाषण ही मुलभूत कौशल्ये आपल्यात असणे आवश्यक आहे आणि ही कौशल्ये विकसित करण्याचे काम 'वाचन' संस्कृती करते. यासाठी मनात जे आहे ते कागदावर उतरवले पाहिजे, त्यातून माणूस हा भविष्यात भारताचा सक्षम नागरिक बनतो.' असे सांगून त्यांनी शिक्षण क्षेत्रातील थोर महात्म्यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनीही शिक्षक दिनाचे महत्व पटवून दिले. अध्यक्षस्थानावरून बोलताना संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे म्हणाले की, 'विद्यार्थ्यांना समजून घेणे ही अवघड कला शिक्षकांकडे असते. शिक्षकांना वेळ प्रसंगी कठोर बनावे लागते. यामागचा हेतू एवढाच की विद्यार्थी शिकून शहाणा झाला पाहिजे. यासाठी शिक्षक हा स्वतःमध्ये असलेल्या सामर्थ्याचा वापर विद्यार्थी घडविण्यासाठी करतो.' असे सांगून त्यांनी बाबा आमटे, संत गाडगेबाबा अशा अनेक संताच्या कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी पीएच. डी. प्राप्त केल्याबद्धल एम.बी.ए.च्या डॉ. मिनल भोरे व चारही महाविद्यालयांतील प्राचार्यांचा व प्राध्यापकांचा 'शिक्षक दिना' निमित्त पाहुण्यांच्या व विद्यार्थ्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी वेणुनगर येथील श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे संचालक दत्तात्रय नरसाळे व सिद्धेश्र्वर बंडगर, डॉ. गणेश संकपाळ, संस्थेचे माजी अध्यक्ष व विश्र्वस्त एन.एस. कागदे, युवा विश्र्वस्त प्रा.सुरज रोंगे, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम.पवार, संस्थेअंतर्गत असलेल्या डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन.डी.मिसाळ, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ.एम.जी.मणियार, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा.एस.व्ही.मांडवे, अभियांत्रिकीच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी प्रतिनिधी राधिका पाटील, गायत्री जाधव, सानिका भांगे, विवेक चव्हाण, सुशांत शेटे, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. सृष्टी लामगुंडे व मानसी लोंढे यांनी सूत्रसंचालन केले तर प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ.यशपाल खेडकर यांनी आभार मानले.

# अन्यथा हमाल-तोलारांचे १० सप्टेंबरपासून कामबंद आंदोलन

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधीः सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य प्रवेशद्वारावर सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातील सर्व हमाल तोलार कामगारांचे विविध मागण्यांसाठी आंदोलन चालू आहे. या आंदोलनातील मागण्या त्वरित मान्य न झाल्यास १० सप्टेंबरपासून कृषी उत्पन्न बाजार समिती, सोलापूर येथे हमाल तोलार बेमुदत कामबंद आंदोलन करणार असल्याचे सोलापूर जिल्हा हमाल मापाडी, माथाडी, श्रमजिवी कामगार समन्वय समितीचे जिल्हाध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य हमाल मापाडी महामंडळाचे सहचिटणीस शिवाजी शिंदे यांनी इशारा दिला आहे.



सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीतील भुसार बाजाराकरिता लागू करण्यात आलेला टप्पा दुरूस्तीचा ठराव रद्द झाला पाहिजे, संपूर्ण माथाडी कामागाराच्या हमाली तोलाईचा भरणा माथाडी बोर्डात झाला पाहिजे, माथाडी कामगारांकरिता, घरकुल व प्राथमिक उपचार केंद्र झालेच पाहिजे, कांदा विभागामधील माल राखणे बंधनकारक करू नये तसेच भुसार व कांदा विभागामध्ये ५० किलोच्या भरतीचे नियमन असताना शेतकरी ६०, ७०, ८० किलो भरतीचे पोते बाजारात आणत आहेत ते त्वरित बंद झाले पाहिजे अशा विविध मागण्या या आंदोलनामध्ये हमाल तोलार कामगारांनी मांडल्या आहेत.

या मागण्या कृषी उत्पन्न बाजार समिती व पणन मंत्री यांनी ताबडतोब सोडविल्या पाहिजे अन्यथा सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमधील सर्व हमाल तोलार, कामगार १० सप्टेंबर पासून बेमुदत काम बंद आंदोलन करणार असल्याचे जिल्हाध्यक्ष शिवाजी शिंदे यांनी सांगितले.

यावेळी प्रशासक मोहनराव निंबाळकर, मार्केट कमिटीचे सचिव दत्तात्रय सुर्यवंशी यांच्याबरोबर हमाल तोलार कामगार बंधूबरोबर बैठक झाली. या बैठकीमध्ये प्रशासक निंबाळकर यांनी जिल्हाध्यक्ष शिवाजी शिंदे यांच्याबरोबर आपल्या मागण्या काय आहेत या माझ्या हातात असतील तर त्या मी पूर्ण सोडवितो. मात्र टप्पा पद्धत हे मात्र पणन मंत्र्यांच्या दालनात असल्याने यावर मी काहीही करू शकत नाही. मात्र कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे येथील टप्पा पद्धतीचे दर ज्या पद्धतीने असतील त्या पद्धतीने तुमचे दरवाढ मात्र मी शंभर टक्के करून देतो.

यावर तुम्ही सर्वांनी चर्चा करून मला सांगावे. या सर्व मागण्या सोडविण्यासाठी मी कटिबद्ध असल्याचे प्रशासक निंबाळकर यांनी सांगितले.यावेळी हमाल पंचायतचे संचालक शिवानंद पुजारी, अमोल शिंदे, उपाध्यक्ष भीमराव सिताफळे, सिद्धु हिप्परगी, नागनाथ खंडागळे, चांदा गफार, किरण मस्के, महेंद्र चंदनशिवे, राजशेखर काळगी, शिवलिंग शिवपुरे, यास्मीन बागवान, हालू जमादार, सुनिता रोटे आदीसह हमाल-तोलार मोठ्या संख्येने उपस्थित होते.